


# निसर्गरम्य रामदरा

## आध्यात्मिक शांतता अन् निसर्गसौंदर्याचा सुरेख संगम !



आधुनिकतेच्या आणि धावपळीच्या युगात माणसाला मनःशांतीची नितांत गरज असते. आठवड्याभराच्या धकाधकीच्या जीवनशैलीतून स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी एखादा निवांत क्षण शोधत असाल, तर पुणे-सोलापूर महामार्गावर वसलेले रामदरा हे तीर्थक्षेत्र तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत आणि निळ्याशार तलावाच्या काठी वसलेले हे ठिकाण पर्यटकांना आणि भाविकांना मोहिनी घालणारे ठरत आहे.

आज आपण जो रामदरा पाहतो, त्यामागे कै. सदगुरु १००८ श्री देवीपुरी महाराज उर्फ धुंदीबाबा यांचे ५० वर्षांचे अथक परिश्रम आणि तपश्चर्या आहे. मूळचे सातारा जिल्ह्यातील बेलावडे गावचे असलेले धुंदीबाबा जेव्हा येथे आले, तेव्हा हा परिसर पूर्णतः ओसाड, निर्जन माळरान होता. एक पडकी धर्मशाळा, शिवलिंग आणि एक तळे (रामकुंड) एवढेच येथे होते.

बाबांनी अक्षरशः डोंगर आणि खडक फोडून या ओसाड माळरानात कष्टाने हे नंदनवन फुलवले. १९८२ आणि १९९६ मध्ये येथे विश्वशांती व लोककल्याणासाठी 'सपादकोटी गायत्री महायज्ञ' पार पडले. या ऐतिहासिक महायज्ञांना चारही पीठांचे शंकराचार्य आवर्जून उपस्थित होते. परदेशातून आलेल्या लाखो भाविकांसाठी येथे २४ तास आमटी-भाताचा प्रसाद सुरू असे. २४ जून २००२ रोजी धुंदीबाबांनी आपली इहलोकातील यात्रा संपवली. सध्या त्यांचे उत्तराधिकारी महंत हेमंतपुरी महाराज या क्षेत्राचा कारभार अतिशय उत्कृष्टपणे सांभाळत आहेत.

रामदरा येथील मंदिरांचे सौंदर्य आणि आध्यात्मिक महत्त्व अद्वितीय आहे. येथील मंदिरांमधील शिवलिंग स्वतः धुंदीबाबांनी घडवलेले आहे. या एकाच शिवलिंगात १२ ज्योतिर्लिंगांचा भाव सामावलेला आहे. शाळुंका उज्जैनच्या महाकालेश्वरा सारखी, सर्पफणा औंढ्या नागनाथ सारखा, खाच काशी विश्वेश्वरासारखी, रेखा श्रीशैल्य मल्लिकार्जुना सारख्या आहेत. याशिवाय, हे एक असे दुर्मिळ मंदिर आहे जिथे एकाच वेळी श्री दत्त, प्रभू श्रीराम आणि महादेव यांचे एकत्रित दर्शन घडते.

सह्याद्रीच्या डोंगररांगांच्या पायथ्याशी वसलेल्या या परिसरात पावसाळ्यात आणि हिवाळ्यात (जून ते जानेवारी) वातावरण अत्यंत आल्हाददायक असते. पर्यटकांसाठी राज्य सरकारच्या वन विभागाच्या वतीने येथे सुशोभिकरण करण्यात आले आहे. तलावावर बांधलेला लाकडी पूल आणि बसण्यासाठी बनवलेल्या आकर्षक झोपड्या यामुळे या क्षेत्राचे सौंदर्य अधिकच खुलले आहे. सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात तरुणाईसाठी रामदरा हा फोटोग्राफीचा हॉटस्पॉट ठरत आहे. डोंगरावर चढून गेल्यास रामायण काळातील 'सीतेची न्हाणी' नावाचे एक पाण्याचे तळेही पाहायला मिळते.



रामनवमी, दत्तजयंती, दहीहंडी, गुरुपौर्णिमा आणि धुंदीबाबांच्या स्मृतीदिनाला येथे विविध धार्मिक कार्यक्रम व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केले जातात. दर रविवारी आणि उत्सवांच्या वेळी येणाऱ्या सर्व भाविकांना येथे मोफत आमटी-भाताचा प्रसाद दिला जातो. येथे पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय असून चहा-नाश्त्यासाठी लहान मोठी हॉटेल्स आहेत. अनेक कुटुंबे घरून डबा आणून निसर्गाच्या सानिध्यात भोजनाचा आनंद घेतात.

पुणे-सोलापूर महामार्गावर पुण्यापासून अवघ्या १८ किमी अंतरावर लोणी काळभोर गाव आहे. लोणी काळभोर वरून दक्षिणेकडे साधारण ७ किमी अंतरावर रामदरा वसले आहे. पीएमपीएल (PMPML) बस, पुणे - मिरज रेल्वेने फुरसुंगी स्थानकावर उतरून किंवा स्वतःच्या वाहनाने येथे सहज पोहोचता येते. लोणी काळभोरवरून भाड्याने रिक्षादेखील उपलब्ध होतात. शनिवार - रविवार किंवा सुट्टीच्या दिवशी सहकुटुंब निसर्गाचा आनंद घेण्यासाठी आणि मनःशांती मिळवण्यासाठी रामदरा या निसर्गरम्य तीर्थक्षेत्राला नक्की भेट द्या !

- राजेंद्र उर्फ बापूसाहेब काळभोर,
(जिल्हाध्यक्ष - प्रिंट व डिजिटल मीडिया पत्रकार संघ पुणे).




